पंडित दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्था, संचलित,

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री

ता. फुलंब्री जि. औरंगाबाद

नॅक मुल्यांकनात 'ब' दर्जा प्राप्त

व

विद्यापीठ अनुदान आयोग, विभागीय कार्यालय, पुणे,

यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

एकदिवसीय

## स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन कार्यशाळा

# अहवाल

दि. २४ डिंसेंबर २०१६

प्राचार्य

डॉ. एस. आर .टकले

कार्यशाळा समन्वयक

डॉ. मंजुषा नळगीरकर

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री

## स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन कार्यशाळा

## दि. २४ डिसेंबर २०१६

## अहवाल

महाविद्यालय व परिसरातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परिक्षेच्या तयारी संदर्भात तज्ञांचे मार्गदर्शन मिळावे या हेतूने दि. २४ डिसेंबर २०१६ रोजी स्पर्धा परिक्षा मागदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. त्याचा अहवाल पुढील प्रमाणे आहे.

उद्घाटन सत्र :-

स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन कार्यशाळेच्या कार्यक्रमास उद्घाटक म्हणून निवृत्त आय. ए. एस. अधिकारी श्री कृष्णा भोगे (संचालक, भोगे करिअर डेव्हलपमेंट अकॅडमी औरंगाबाद) हे लाभले होते. तर अध्यक्ष म्हणून डॉ. सर्जेराव ठोंबरे (सचिव, पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्था (वरुड) औरंगाबाद) हे लाभले होते श्री कृष्णा भोगे यांनी स्पर्धा परिक्षेची तयारी या विषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

उद्घाटन कार्यक्रम प्रसंगी श्री कृष्णा भोगे यांनी असे मत व्यक्त केले की, स्पर्धा परिक्षेत यश संपादन करण्यासाठी विद्यार्थ्यांनी आपले ध्येय निश्चित करावे. एकदा ध्येय निश्चित झाले की, ज्या पदावर आपल्याला जायचे आहे. त्याचा अभ्यासक्रम पाठ करावा अभ्यासक्रमाचे सर्व ज्ञान मिळविण्यासाठी जिद्द, चिकाटी, परिश्रम, अभ्यास व प्रयत्न करणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांनी अपयश आल्यामुळे खचून न जाता पुन्हा प्रयत्न करणे गरजेचे आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थी देखील आय. ए. एस. अधिकारी बनू शकतात असा विश्वास त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. महाविद्यालयाने विद्यार्थ्यांसाठी चालू घडामोडीचे पुस्तक, विविध विषयावरील दर्जेदार नोट्सचे पुस्तक तयार करावे. ज्याचा विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी लाभ होईल असे ही मत व्यक्त केले. विद्यार्थ्यांसाठी गटचर्चा व सेमिनार घेण्यात यावेत अशी ही सूचना श्री कृष्णा भोगे यांनी या प्रसंगी केली.

अध्यक्षीय समारोप प्रसंगी डॉ. सर्जेराव ठोंबरे यांनी असे मत व्यक्त केले की, स्पर्धा परिक्षा हे एक असे क्षेत्र आहे. ज्या माध्यमातून व्यक्ती चांगल्या अधिकार पदावर काम करु शकते व

समाजाच्या विकासात महत्त्वाचे योगदान देऊ शकते. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी आपण स्पर्धा परिक्षेत टिकाव धरु शकणार नाही अशी भिती व न्यूनगंड बाळगण्याची मूळीचे गरज नाही. तुम्ही देखील अभ्यासाचे नियोजन, परिश्रम व चिकाटीने स्पर्धा परिक्षेत यशस्वी होऊ शकता असे मत मांडून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले.

शदरील कार्यशाळेचे प्रास्ताविक डॉ. मंजुषा नळगीरकर यांनी मांडले त्यात त्यांनी महाविद्यायातील स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन समिती मार्फत घेतल्या जाणाऱ्या उपक्रमांविषयी ( स्पर्धा परिक्षा तासिका, अभ्यासगत तासिका, अभ्यासक्रम, नोकरी विषयक जाहिराती लावणे, करिअर मंत्र पुरवणिचे संकलन, सामान्य ज्ञान स्पर्धा माहिती दिली सुत्रसंचालन व आभार कृष्णा साबळे व शितल जाधव यांनी केले.

सत्र पहिले :-

पहिल्या सत्रास प्रमुख वक्ते म्हणून श्री मधूर पोफळे (समन्वयक, युनिक अकॅडमी औरंगाबाद) हे लाभले होते त्यांनी यु. पी. एस. सी परिक्षेची तयारी या विषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शक केले. अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. पांडुरंग कल्याणकर हे लाभले होते. श्री मधूर पोफळे यांनी आपल्या मागदर्शनात असे मत व्यक्त केले की, विद्यार्थ्यांनी यु. पी. एस. सी. ची तयारी केली. तर ते एम. पी. एस. परिक्षा सहज पास होऊ शकतात. म्हणजेच आपल ध्येय मोठ असेल तरच त्याच्या खालचे ध्येय आपण सहज प्राप्त करु शकतो. ग्रामीण भागातील मुलांना यु. पी. एस. सी. परिक्षा देण्याविषयी भिती व संकोच वाटतो. कारण ती परिक्षा हिंदी/इंग्रजी भाषेतून असल्यामुळे आणि निगेटिव्ह मार्किंग सिस्टममुळे अशी भिती विद्यार्थ्यांनी मनातून काढून टाकावी, इंग्रजी जमत नसेल तर हिंदीची तयारी करावी. सतत हिंदी सहित्य वाचनातून व बोलण्यातून आपण हिंदी सुधारु शकतो ज्या प्रश्नांची उत्तरे माहित आहेत, अशीचे उत्तरे दिली तर निगेटिव्ह मार्किंगमुळे नुसकान होणार नाही असे श्री पोफळे यांनी सांगितले. या सोबतच यु. पी. एस. सी. परिक्षेतून कोणती पदे भरली जातात त्याचा अभ्यासक्रम कसा आणि त्याची तयारी कशी करावी या विषया सविस्तर मार्गदर्शन श्री पोफळे यांनी केले.

सत्र दुसरे :-

दुसऱ्या सत्रात प्रमुख वक्ते म्हणून श्री ज्ञानेश्वर वराडे (संकल्प, एज्यूकेशन अकॅडमी औरंगाबाद) हे लाभले होते त्यांनी बॅकिंग परिक्षा तयारी या विषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे वाणिज्य विभागाचे विभाग प्रमुख डॉ. महेश थोरात हे लाभले होते. श्री ज्ञानेश्वर वराडे यांनी आपल्या मार्गदर्शनात बॅकिंगच्या परिक्षा कोणत्याही शाखेचा पदविधर

देऊ शकतो असे मत मांडले. बॅकिंग परिक्षेसाठी मॅथेमॅटीक्स, अकाऊंट, स्टॅटीस्टीक, टॅली, व कॉम्प्यूटर चे ज्ञान असणे गरजेचे आहे. असे सांगतले. बॅकींगच्या परिक्षा कोण कोणत्या पदासाठी असतात. त्याचा अभ्यासक्रम आणि तयारी या विषयीचे सविस्तर मार्गदर्शन श्री ज्ञानेश्वर वराडे यांनी विद्यार्थ्यांना दिले.

समारोप सत्र :-

समारोप सत्रास प्रमुख वक्ते म्हणून डॉ. अनिल पाटिल ( माजी संचालक, नगर नियोजन औरंगाबाद) हे लाभले होते. त्यांनी एम. पी. एस. सी. परिक्षा या विषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर .टकले हे लाभले होते. श्री अनिल पाटिल यांनी एम. पी. एस. सी परिक्षेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना कोणकोणत्या पदावर जाता येते, त्याचा अभ्यासक्रम व तयारी या विषयी सविस्तर मार्गदर्शन केले. एम. पी. सी. परिक्षा ही मराठी माध्यमातून असल्यामुळे अभ्यासक्रम व संकल्पना विद्यार्थ्यांना चांगल्या पध्दतीने कळू शकतात एम. पी. एस. सी. परिक्षेसाठी विद्यार्थ्यांचे चौफेर वाचन असावे, गटचर्चा, स्वतःच्या नोट्स, चालू घडामोडीची नोंदवही इ. माध्यामातून विद्यार्थी आपले ज्ञान वाढवू शकतात. पाटील यांनी आपल्या जीवनातील वेगवेगळया परिक्षेसंदर्भातील अनुभव सुध्दा विद्यार्थ्यांना सांगितले. अध्यक्षीय समारोपात डॉ. एस .आर . टकले यांनी असे मत व्यक्त केले की, आज वाढती बेरोजगारी लक्षात घेता नोकऱ्यांचे प्रमाण कमी होत आहे, त्यामुळे स्पर्धा परिक्षा हे एकच माध्यम आहे. जिथे शासकिय नोकऱ्यांची संधी आहे. पण त्यासाठी विद्यार्थ्यांना आपली गुणवत्ता सिध्द करावी लागते.

सदरिल कार्यशाळेत प्रस्तुत महाविद्यालय व अन्य महाविद्यालयातील ८६ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

पंडित दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्था, संचलित,

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री

# व

## विद्यापीठ अनुदान आयोग, विभागीय कार्यालय, पुणे,

## यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

### स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन कार्यशाळा

### छायाचित्रे दि. २४/१२/२०१६

**उद्‌घाटन सत्र**



स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन कार्यशाळेचे उद्‌घाटन करतांना श्री कृष्णा भोगे, डॉ. सर्जेराव ठोंबरे सर व प्रा. सुभाष टकले सर




**श्री कृष्णा भोगे सरांचे स्वागत करतांना डॉ.सर्जेराव ठोबरे सर**




कार्यशाळेचे प्रास्ताविक करतांना डॉ.मंजुषा नळगीरकर




श्री कृष्णा भोगे सर स्पर्धा परिक्षेची तयारी या विषयीवर  मार्गदर्शन करातानां.




अध्यक्षीय समारोप प्रसंगी  बोलतांना डॉ.सर्जेराव ठोंबरे सर

**सत्र पहिले**




**श्री मधुर पोफळे सर युपीएससी परिक्षा तयारी या विषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना.**

**कार्यशाळेत सहभागी झालेले विद्यार्थ्यी**









## सत्र दुसरे




श्री ज्ञानेश्वर वराडे सर बॅकिंग परिक्षा तयारी या विषयी  विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना.




दुस-या सत्राचा अध्यक्षीय समारोप करतानां डॉ.व्यंकटेश लांब

# समारोप सत्र




डॉ.अनिल पाटील सर एमपीएससी परिक्षाची तयारी या विषयी मार्गदर्शन करतानां




समारोप सत्राचा अध्यक्षीय समारोप करतानां डॉ.एस.आर.टकले सर




विद्यार्थ्यी आपले कार्यशाळे विषयीचे मनोगत व्यक्त करतानां




सहभागी विद्यार्थ्यांना कार्यशाळेचे प्रमाणपत्र वितरीत करतानां डॉ.अनिल पाटील व डॉ.एस.आर टकले सर

पंडित दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्था, संचलित,

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री

व

## विद्यापीठ अनुदान आयोग, विभागीय कार्यालय, पुणे,

## यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

### स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन कार्यशाळा

**बातमी प्रसिध्दी** दि.२४/१२/२०१६

# गुणवत्तेची सर्वोत्तम पातळी गाठण्याचा विद्यार्थ्यांनी प्रयत्न करावा

(26)

## कृष्णा भोगे : सावता माळी महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा कार्यशाळेचे उद्घाटन

**फुलंब्री, ता. २५ (बातमीदार) :** विद्यार्थ्यांनी गुणवत्तेची सर्वोत्तम पातळी गाठण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले पाहिजेत. जिद्द, चिकाटी, आत्मविश्वास व कठोर परिश्रमातून निश्चित यश मिळत असल्याचे प्रतिपादन निवृत्त माजी विभागीय आयुक्त कृष्णा भोगे यांनी केले. येथील संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय व यूसीजी विभागीय कार्यालय, पुणे यांच्यातर्फे महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कार्यशाळेचे शनिवारी (ता. २४) आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेचे उद्घाटन भोगे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव डॉ. सर्जेराव ठोंबरे यांची उपस्थिती होती. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष टकले यांची प्रमुख उपस्थिती होती. स्पर्धा परीक्षेची तयारी कशी करावी या विषयावर बोलत असताना कृष्णा भोगे म्हणाले की, खासगी क्षेत्रातही मोठ्या स्पर्धा निर्माण झाल्या आहेत. या स्पर्धांना सामोरे जाण्यासाठी विद्यार्थ्यांना खूप प्रयत्न करावे लागतील. कारण स्पर्धा परीक्षेतील यशासाठी गुणवत्ता हाच एक निकष आहे. गुणवत्तेशिवाय कुठल्याच बाबीचा विचार सध्याच्या अत्याधुनिक युगात होऊ शकत नाही. यासाठी विद्यार्थ्यांनी सकारात्मक वृत्ती, दृढनिर्धार, चिकाटी, जिद्द, सराव या मुद्यांच्या आधारे सतत परिश्रम करायला पाहिजेत. सकारात्मक विचाराने आपण आपला अभ्यास करावा, जिंकण्याची प्रवृत्ती असावी. सकारात्मक प्रवृत्ती म्हणजे वाळवंटामध्ये हिरवळ निर्माण करण्याची जिद्द अंगी बाळगायला पाहिजे. विचार व्यक्त करण्याची शक्ती आपल्यामध्ये निर्माण करावी. तसेच ते विचार मुद्देसूद लिहिण्याचा सराव करणे अपेक्षित आहे. त्याशिवाय यशापर्यंत पोचता येणार नाही. म्हणून कठीण परिश्रम करण्याची तयारी विद्यार्थ्यांनी ठेवायला पाहिजे.

अध्यक्षीय समारोप करताना डॉ. ठोंबरे म्हणाले की, विद्यार्थ्यांनी विषयाच्या मूलभूत संकल्पना समजून घेतल्या पाहिजेत. माहिती संकलन करून त्या माहितीचे अवलोकन करता आले पाहिजे. हे करण्यासाठी विद्यार्थ्यांनी महत्त्वाकांक्षा बाळगली पाहिजे. जेणेकरून अपयश कधीच येणार नाही. डॉ. मंजूषा नालगीरकर यांनी प्रास्ताविक केले. डॉ. अनिल पाटील, ज्ञानेश्वर वराडे, डॉ. व्यंकटेश लांब, डॉ. महेश थोरात, खालिद अहमद, मधुर पोफळे, डॉ. पांडुरंग कल्याणकर यांनी दुसऱ्या, तिसऱ्या व चौथ्या सत्रात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन कृष्णा डवणे, शीतल जाधव, लक्ष्मीकांत ढेपले यांनी केले. यावेळी प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



फुलंब्री : येथे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना कृष्णा भोगे. व्यासपीठावर संस्थेचे सचिव डॉ. सर्जेराव ठोंबरे, प्राचार्य डॉ. सुभाष टकले.

दै. सकाळ - 26/12/2016

दैनिक तरुण भारत

# स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन कार्यशाळा संपन्न

(27)

दि- 28/12/2016

फुलंब्री :येथील संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयात महाविद्यालय, विभागीय कार्यालय, पुणे यांच्या संयुक्त विध्यमाने व समाजशास्त्र विभाग वतीने स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कार्यशाळा संपन्न झाली. अध्यक्षस्थानी संस्था ,सचिव, डॉ.सर्जेराव ठोंबरे यांची उपस्थिती होती. डॉ. पांडुरंग कल्याणकर, डॉ.व्यंकटेश लांब, डॉ. महेश थोरात, खालिद अहमद यांची व्यासपीठावर उपस्थिती होती.

या कार्यशाळेचे उद्घाटन निवृत्त माजी विभागीय आयुक्त (खड) कृष्णा भोगे यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी बीजभाषक म्हणून स्पर्धा परीक्षेची तयारी कशी करावी या विषयावर बोलत असताना श्री.भोगे म्हणाले की, खाजगी क्षेत्रातही स्पर्धा आहेत या स्पर्धांना सामोरे जाण्यासाठी विध्यार्थ्यांना खूप प्रयत्न करावे लागतील. कारण स्पर्धा परीक्षेतील यशासाठी गुणवत्ता हाच एक निकष आहे. कारण गुणवत्तेशिवाय कुठल्याच बाबीचा विचार होऊ शकत नाही. यात सकारात्मक वृत्ती, दृढ निर्धार, चिकाटी, जिद्ध, सराव हे गुण विध्यार्थ्यांमध्ये हवेत.

त्याशिवाय यशाप्राप्तीसाठी कठीण परिश्रम करण्याची तयारी ठेवावी.प्रास्ताविक डॉ. मंजूषा नळगीरकर यांनी केले. अध्यक्षीय समारोप करताना डॉ. सर्जेराव ठोंबरे म्हणाले की, विध्यार्थ्यांनी विषयांच्या मुलभूत संकल्पना समजून घेतल्या पाहिजेत. माहिती संकलन करून त्या माहितीचे संकलन करता आले पाहिजे. हे करण्यासाठी विध्यार्थ्याने महत्त्वाकांक्षा बाळगली पाहिजे. आणि हे करणाऱ्यांना अपयश कधीच येत नाही. दुसऱ्या सत्रात मधुर पोफळे, तिसऱ्या सत्रात ज्ञानेश्वर वराडे यांनी विविध शासकीय बँकासंदर्भात व त्यांच्या परीक्षेसंदर्भात माहिती दिली तर चौथ्या सत्रात डॉ. अनिल पाटील यांनी एम.पी.एस.सी. स्पर्धा परीक्षेची तयारी कशी करावी याविषयी माहिती दिली.

सूत्रसंचलन कृष्णा डवणे, शितल जाधव, लक्ष्मीकांत ढेपले यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ.मंजुषा नळगीरकर, प्रा.अनिल जाधव यांनी परिश्रम घेतले. यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित राहीले.

# स्पर्धा परीक्षेत फक्त गुणवत्ता हाच निकष

**फुलंब्री :** 'स्पर्धा परीक्षेतील यशासाठी गुणवत्ता हाच एक निकष आहे. तेथे गुणवत्तेशिवाय कुठल्याच बाबींचा विचार होऊ शकत नाही. त्यामुळे कठोर परिश्रम करून गुणवत्ता प्राप्त करणे गरजेचे आहे,' असे प्रतिपादन माजी सनदी अधिकारी कृष्णा भोगे यांनी केले.

येथील संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयात आयोजित स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कार्यशाळेत ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्था सचिव डॉ. सर्जेराव ठोंबरे यांची उपस्थिती होती. डॉ. पांडुरंग कल्याणकर, डॉ. व्यंकटेश लांब, डॉ. महेश थोरात, खालीद अहमद यांची व्यासपीठावर उपस्थिती होती. माजी सनदी अधिकारी भोगे यांच्या हस्ते